**"फेब्रुवारी २०१९" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती...**

**(क) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ८ फेब्रुवारी २०१९ च्या शासन ज्ञापनान्वये लिपिक-टंकलेखक (मराठी / इंग्रजी) परीक्षा २०१७ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने प्रतिक्षायादीतील शिफारस केलेल्या १८६ उमेदवारांचे मंत्रालयीन प्रशासकीय विभागात व बृहन्मुंबईतील राज्य शासनाच्या विविध कार्यालयातील पदांवर नियतवाटप करण्यात आले आहे.

- दिनांक १२ फेब्रवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त कार्यालय / कार्यासनांच्या वित्तीय प्राधिकाराच्या प्रयोजनार्थ "प्रशासकीय विभाग प्रमुख" म्हणून घोषित करण्यात आले आहे.

- दिनांक २२ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय (कार्यासन-३३ निवडणूक शाखा) मधील टंकलेखक (मराठी / इंग्रजी), गट-क संवर्गातील २ अस्थायी पदे लिपिक-टंकलेखक, गट-क या अस्थायी पदात रुपांतरित करण्यात आले आहे.

- दिनांक २५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन शुद्धीपत्रान्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक-१ ते ३ नुसार सामानय प्रशासन विभाग (खुद्द) व अधिनस्त कार्यालयातील प्रशासकीय विभाग प्रमुख, विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख यांची अद्ययावत यादी तयार करण्यात आली आहे.

- दिनांक २५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयाच्या आस्थापनेवरील १८७ अस्थायी पदे दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यात आली आहेत.

- दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रालयीन विभागातील कक्ष अधिकारी या संवर्गाची वर्षनिहाय पदसंख्या निश्चित करण्यात आली आहे.

**(ख) बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त**

- भारतीय प्रशासन सेवेतील २५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
- उपसचिव-२, वरिष्ठ स्वीय सहायक-१, लिपिक-टंकलेखक-१ अशा ४ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

**(घ) प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन**

- अवर सचिव-२, सहायक कक्ष अधिकारी-१ अशा ३ अधिकारी / कर्मचारी यांना प्रतिनियुक्ती देण्यात आली आहे.
- सहसचिव संवर्गातील एका अधिकाऱ्याचे प्रत्यावर्तन करण्यात आले.
- उपसचिव-१, अवर सचिव-२ अशा ३ अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीस मुदतवाढ देण्यात आली आहे.
- कक्ष अधिकारी-१, सहायक कक्ष अधिकारी-१, लिपिक-टंकलेखक-१ अशा ३ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवेस मुदतवाढ देण्यात आली आहे.

**(छ) ज्येष्ठतासूची**

- दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर पदोन्नतीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील गट-ड मधील ४ कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये गट-क मधील लिपिक-टंकलेखक पदावर कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्तीसाठी अर्हता प्राप्त करणाऱ्या मंत्रालयीन विभागातील वाहनचालक २ कर्मचाऱ्यांची दिनांक २१ फेब्रुवारी २०१८ रोजीची अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**(च) <u>प्रशिक्षण / परीक्षा</u>**

- दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशात्तर प्रशिक्षण परीक्षा २०१९ ला पुन्हा बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत पाठविण्याबाबत सूचित केले आहे.

- दिनांक १५ फेब्रुवारी २०१९ च्या शासन आदेशान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-४/अ अंतर्गत कक्ष अधिकारी गट-ब संवर्गातील परिविक्षाधीन ७ उमेदवारांचे खातेनिहाय संलग्नता प्रशिक्षण दिनांक १८ फेब्रुवारी २०१९ ते २० एप्रिल २०१९ या कालावधीत संबंधित मंत्रालयीन विभागामध्ये आयोजित केले आहे.

- दिनांक २० फेब्रुवारी २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये लिपिक-टंकलेखक सेवाप्रवेशात्तर प्रशिक्षण परीक्षा २०१९ ला पुन्हा बसू इच्छित असलेल्या उमेदवारांचे अर्ज दिनांक २८ फेब्रुवारी २०१९ पर्यंत पाठविण्याबाबत सूचित केले आहे.

* * * * * *